# अव्यक्त प्रश्न

## प्राथमिक शिक्षणातील अव्यक्त प्रश्न

शाळेमध्ये मुले जात नाहीत; गेली तर तेथे त्यांचे जमत नाही, ती तेथे रमत नाहीत म्हणून टिकतही नाहीत. मुलांच्या गळतीचा प्रश्न त्यातून निर्माण होतो. जी मुले शाळेत टिकतात त्यांचे औपचारिक शिक्षणही धडपणे होत नाही. मुले किमान पातळीवरील अपेक्षित गोष्टीही शिकत नाहीत हे शिक्षणविषयक मूलभूत प्रश्न आहेत. त्यांचा प्रादुर्भाव प्रामुख्याने शहरांमधील मागासलेल्या समाजगटांतून आणि झोपडपट्ट्यांतून. तसेच जवळजवळ पूर्णतः ग्रामीण भागातून आढळून येतो. ही अर्थातच ठळकपणे प्रत्ययाला येणारी बाब आहे. परंतु अजूनही काही शिक्षणविषयक प्रश्न तेवढेच महत्त्वाचे असूनही पुरेसे पुढे येत नाहीत. त्यामुळे त्यांच्याविषयी, त्यांच्या सोडवणुकीविषयी पुरेसा विचार व त्या विचारावर आधारित आचार, शासकीय पातळीवर, समाजाच्या स्तरावर आणि शाळांतर्गत व्यवस्थापनाच्या स्तरावर होत नाही. प्राथमिक शिक्षणातील अशा 'अव्यक्त' प्रश्नांनाही विचारांच्या कक्षेत आणायला हवे आहे.

### शिक्षकांची उदासीनता

अशा प्रकारचा पहिला प्रश्न आहे तो प्राथमिक शाळांमधील शिक्षकांच्या सार्वत्रिक उदासीनतेचा. शिक्षक आपणहून शिक्षणाभिमुख होत नाही, आपल्या पूर्वज्ञानाची अर्धीमुर्धी पोतडी पूर्ण भरा वी असे त्याला वाटत नाही. आपण जे काही विषय शिकवतो त्या विषयांच्या क्षेत्रात काय किंवा ज्यांना आपण शिकवू लागतो त्या विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक व कौटुंबिक क्षेत्रात काय, त्याला कोणतीच जिज्ञासा नसते. शिक्षण सार्थ ठरवण्यासाठी समोरची मुले आणि हातातील विषय या दोन्हींच खोलवरचे आकलन असावे लागते. शिक्षकाची जिज्ञासा जागृत असल्याशिवाय असे आकलन होणार नाही. शिक्षक आपल्या दैनंदिन कामात रमत नाही. कारण आपण काही नव्याने घडवावे असे त्याच्या डोळ्यांसमोर येत नाही, आणि आपल्या विद्यार्थ्यांच्यात त्याला रस वाटत नाही. प्राथमिक शिक्षकांच्या बाबतीत बऱ्याचदा असेही आढळते की, त्यांच्या स्वतःच्या शिक्षणाने त्यांच्यात काही सामाजिक मूल्ये रूजवलेलीच नसतात. त्यामुळे प्राथमिक शिक्षक आपल्या व्यवसायाला न्याय देऊ शकत नाही की नोकरीचे सामान्य नियम स्वयंशिस्तीने पाळू शकत नाही. रोज शाळेत येणे, वेळेवर येणे, वेळेपूर्वी न जाणे, विद्यार्थ्यांशी सहकाराचा संबंध प्रस्थापित करणे, पालकांशी विश्वासाचा संपर्क निर्माण करणे आणि विद्यार्थ्याला शाळेत रमविणे, या सर्वच बाबतीत शिक्षक नापास होताना दिसतो.

व्यवयास पूर्व असे डी.एड्., बी.एड् चे प्रशिक्षणही पठडीबद्ध व परीक्षांनुसारी झालेले असल्यामुळे, शिक्षकीपेशाला अपेक्षित असणारी मूल्य -गुण-कौशल्यांची बेगमी त्यातून होत नाही. व्यवसायांतर्गत शिक्षणाचे पलटे, नवे विचार, नव्या संकल्पना त्यांच्या कानांपर्यंत नेतात, परंतु मनांपर्यंत पोचवत नाहीत. त्यामुळे शिक्षकांत, प्रशिक्षणाने घडवायचा बदल अपेक्षेप्रमाणे होत नाही. प्राथमिक शिक्षणाच्या शेतांवर शिक्षकांच्या

उदासीनतेचे पसरलेले सावट दूर झाल्याशिवाय हे शिक्षण तरारून फोफावणार नाही, हे लक्षात घेऊनच इथून पुढे 'प्राथमिक शिक्षक' या विषयाचा सखोल विचार करावा लागणार आहे.

**शिक्षकांचे पारतंत्र्य**

या पहिल्या प्रश्नाची संबंधित आणि त्याची कारणमीमांसा देणारा दुसरा प्रश्न आहे. तो म्हणजे शिक्षकांच्या पारतंत्र्याचा प्रश्न. आपली अशी समजूत आहे की, प्राथमिक शिक्षकाला कायमस्वरूपी स्थिर सरकारी नोकरी असते; आणि बऱ्यापैकी पगारही मिळत असतो, त्यामुळे शिक्षक एकीकडे बेफिकीर होतो तर दुसरीकडे तो नवे काही घडविण्याच्या बाबतीत उदासीन असतो. या म्हणण्यात काही प्रमाणांत तथ्य असेल तरी ते शिक्षकाच्या उदासिनतेचे पुरेसे स्पष्टीकरण देत नाही. शिक्षकाच्या उदासिनतेचे खरे कारण शिक्षकाचे पारतंत्र्य हे आहे. सरकारी शाळांतील शिक्षक हा शासनाचा गुलामअसतो. त्यामुळे त्याला शिक्षणात बदल घडविण्याची, शिक्षणाविषयी विचार करण्याची जबाबदारी पूर्णपणे शासनावर टाकून स्वस्थ राहता येते. शासकीय नियम, शासकीय अभ्यासक्रम, शासकीय निर्यायाने ठरलेले कार्यक्रम व नोंदी यांच्याबाहेर जाण्याचे स्वातंत्र्य शिक्षकाला नसते. याचा हळूहळू परिणाम असा घडतो की, त्याच्यात थोडीफार असलेली स्वयंप्रेरणा दबली जाते. त्याने आपणहून काही करावे अशी प्रेरणा शासन किंवा त्यांचे स्थानिक अधिकारी देऊ शकत नाहीत. त्यामुळे स्वतःहून काही करण्याकडे तो दुर्लक्ष करतो व कालांतराने त्याची वृत्तीच तशी बनते. शिक्षकाला वर्गात विद्यार्थ्यांच्या कलाने त्यांना घडवण्याचे स्वातंत्र्य, शाळेत अभ्यासक्रमाला थोडीफार कलाटणी देऊनही नवे प्रयोग करण्याचे स्वातंत्र, मुलांना शाळेबाहेरच्या जगात घेऊन जाण्याचे स्वातंत्र्य असेल तर शिक्षकाच्या वृत्तीतही बदल घडेल असे वाटते. प्राथमिक शिक्षणातील परिवर्तनाला हितकारक अशीच ही गोष्ट असेल.

**पालकांची उदासीनता**

शिक्षकांच्या उदासीनतेइतकाच पालकांच्या उदासीनतेचा प्रश्नही महत्त्वाचा आहे.'पालकवर्ग ' याची आपली व्याख्याच मर्यादित आहे. जी मुले शाळेत येतात केवळ त्यांच्याच पालकांचा समावेश आपण 'पालकवर्गा'त करीत असतो. परंतु शाळेच्या आजूबाजूला इतस्ततः फिरणारी, शाळेत न जाणारी जी मुले असतात त्यांच्या पालकांचे काय ? या पालकांशी संपर्क साधून, आपल्या पाल्यांविषयीची त्यांच्यात असलेली शैक्षणिक उदासीनता दूर करण्याचे व्यापक काम शाळांनाच आणि पर्यायाने शाळांमधील शिक्षकांनाच हाती घ्यायला हवे आहे. पालक बहुधा मुलांना शाळेत पाठवायला तयार असतात. निदान मुलांचे तीन ते आठ हे वय असे असते की, या वयात पालकांसमोर मुलांच्या मजुरीच्या पर्याय उपलब्ध नसतो. त्यामुळे या वयातील मुलांना शाळेत आणणे तुलनेने सोपे असते. बऱ्याचदा शाळा गावात असली तरी ती गावाची नसते. गावकऱ्यांशी तिचा साक्षात संबंध नसतो. शाळा गावाचे सांस्कृतिक केंद्र बनून गावाला कधीच आपलेसे करीत नाहीत. त्यामुळे गावकरी, म्हणजेच सर्वसामान्य पालकवर्ग शाळेविषयी उदासीन असतो. साहजिकच त्यांचा शाळांवर अंकुशही राहत नाही. शाळा हे गावविकासाचे प्रधान केंद्र आहे, ही भावना गावागावांतून पसरल्याशिवाय आणि शाळांना तसे रूप प्राप्त झाल्याशिवाय शाळांच्या परिवर्तनाची वाट मोकळी होणार नाही.

**शैक्षणिक वातावरण**

शालांतर्गत वातावरणाचा प्रश्न हा सगळयात मोठा प्रश्न आहे. शाळांमधील भौतिक सुविधांचा विचार यापूर्वी येऊन गेलेला आहे. आपण इथे जो प्रश्न करतो आहोत तो म्हणजे शाळांमधून शैक्षणिक वातावरण अस्तित्त्वात आहे काय, हा. शैक्षणिक वातावरण असे मी जेव्हा म्हणतो तेव्हा त्यामध्ये दोन स्तरांवरील संबंधाचा समावेश होतो. एक, शिक्षक-शिक्षक संबंधाचा व दुसरा शिक्षक - विद्यार्थी या स्तरावरील संबंधांचा. शाळेमध्ये पाच - सात तास एकत्र असणारे किंवा शाळेबाहेरही परस्परांशी जवळचे संबंध असणारे शिक्षक परस्परांशी शैक्षणिक विषयांबद्दल कितपत चर्चा करतात? त्यांच्या नित्य बोलण्यातले विषय उपक्रम, विद्यार्थ्यांना द्यावयाचे अनुभव, विद्यार्थ्यांसमवेत घ्यावयाचे अनुभव अशा शैक्षणिक स्वरूपाचे असतात काय ? शाळांमध्ये शैक्षणिक स्वरूपाची सजावट असते काय ? शाळांच्या भिंती शिक्षणविषयक बातचीत करतात काय ? शाळांमध्ये शैक्षणिक कार्यक्रमांची रेलचेल असते काय? शिक्षक परस्परांमध्ये, यांविषयी चर्चा करणे, योजना आखणे हे करतात का? कल्पकतेचा वापर करून शाळेत शैक्षणिक वातावरण निर्माण करणे हेच मुळी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे एक प्रभावी साधन आहे; याची जाण शिक्षकांनी कृतीतून दाखवण्याची गरज आहे.

शाळेतील शैक्षणिक वातावरण प्रभावी करणारा आणखी एक घटक आहे. तो म्हणजे शिक्षक -विद्यार्थी संबंध. शिक्षक व विद्यार्थी यांमधील अंतर जेवढे जास्त तेवढे शाळेतील वातावरण उदासीनतेचे असते. याउलट शिक्षक व विद्यार्थी यांच्यात परस्परांत जेवढे जवळीकतेचे नाते निर्माण होते; तेवढे शाळेतील वातावरण उत्साहाचे असते. शिक्षकाला विद्यार्थी समजला पाहिजे आणि विद्यार्थ्याला शिक्षक आवडला पाहिजे. हे घडून आले की, शाळेतील वातावरण हे शैक्षणिक देवाण - घेवाणीचे होऊ लागते. वर्गातील अभ्यासप्रक्रिया शिक्षकांइतकीच विद्यार्थ्यांच्या सहभागाची असेल तर वर्गात खरे शैक्षणिक वातावरण निर्माण होते. असे झाले की मगच, शिक्षकांची उदासीनता जाऊन त्यांच्या कल्पकतेला धुमारे फुटू लागतात आणि विद्यार्थ्यांमधील उदासीनता मावळून त्यांना शिक्षण आनंददायी वाटू लागते.

**प्रौढकेंद्री शिक्षण**

वर उल्लेखिलेले सर्वच 'अव्यक्त' प्रश्न एका, शिक्षणपद्धतीविषयक व्यापक प्रश्नाच्या पोटात येतात. तो प्रश्न म्हणजे आपल्या शाळांतील शिक्षण 'प्रौढकेंद्री' आहे की ' बालकेंद्री' आहे? हा होय. आजवरचे आपले शिक्षण निखालसपणे 'प्रौढकेंद्री' च आहे. प्रौढकेंद्री शिक्षणपद्धतीत शिक्षकाने विद्यार्थ्यांना सांगायचे असते व विद्यार्थ्यांनी जे आणि जेवढे सांगितले असेल ते आणि तेवढेच ऐकायचे असते. येथे विद्यार्थी हा शिक्षकांचा गुलाम असतो. त्याला स्वयंप्रेरणेने काही करण्याचे स्वातंत्र्य नसते. शिक्षकाने त्याला व स्वतःलाही अभ्यासक्रमाशी आणि परीक्षांशी जखडलेले असते. शिक्षण अनुभवाधिष्टित नसते तर ते पुस्तकाधिष्टित असते. प्रौढकेंद्री शिक्षणपद्धतीत शिकवण्याची प्रक्रिया प्रभावी असते आणि शिकण्याची प्रक्रिया मंद असते. विद्यार्थ्यांच्या दृष्टीने हे सहभागी शिक्षण नसल्यामुळे, येथे स्वयंअध्ययनाची नैसर्गिक प्रक्रिया प्रभावीपणे घडून येत नाही. प्रौढकेंद्री शिक्षणपद्धतीत शिक्षकांची भूमिका महत्त्वाची असते. शाळेच्या शिक्षणात तो केंद्रस्थानी असतो. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य पूर्णतः शिक्षकावर, त्याच्या ज्ञानावर, कौशल्यांवर, वृत्तीवर, कृतीवर  आणि उक्तीवर अवलंबून असते. आणि

अशा परिस्थितीत शिक्षक उदासीन असेल तर शाळेतील सबंध शिक्षण प्रक्रियाच कोमेजते. मुलांना शिक्षण निरस वाटते; आणि ती मग अशा शिक्षणापासून पळ काढू पाहतात.

आज आपण, प्राथमिक शिक्षणात परिवर्तन घडवून आणण्याचा जो विचार व प्रयत्न करीत आहोत, तो या शिक्षणपद्धतींशी संबंधित आहे. थोडक्यत असे म्हणता येईल की प्रौढकेंद्री शिक्षणाकडून बालकेंद्री शिक्षणाकडे जाणे, म्हणजेच शिक्षणात परिवर्तन घडवून आणणे होय. आज शासकीय पातळीवरून आणि युनिसेफच्या सहाय्याने अंमलांत आणले जाणारे डी.पी.ई.पी., प्राथमिक शिक्षण समृद्धी योजना, अशा, असे सर्वच प्रकल्प या दिशेने वाट चोखाळणारे आहेत. अर्थात या सर्व कार्यक्रमांचा मुख्य भर शिक्षकांना अल्पशा शिक्षणाने या दिशेने जाण्यासाठी प्रशिक्षित करण्यावर. त्यातून थोडेफार साधते पण बरचसे निसटते, असाच प्रत्यय येतो. यासंदर्भातील शाळांमधील आजपर्यंत 'अव्यक्त' असणाऱ्या प्रश्नांची दखल घेऊन त्यांवर तोडगे शोधीत वाटचाल करायला हवी आहे.

❖